# बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग

शिक्षणधिकारी यांचे मुख्य कार्यालय त्रिवेणी संगम मनपा शालेय इमारत,

त्रिवेणी सदनच्या मागे

क्र. ईओजी/1595, दि. 20.11.2020

## परिपत्रक

**बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महापलिका प्राथमिक व माध्यमिक**
**आणि सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या खाजगी अनुदानीत**
**व विनाअनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळा**

विषयः **बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या सर्व प्रकारच्या शाळा दि. 31 डिसेंबर 2020 पर्यंत बंद ठेवण्याबाबत.**

संदर्भः 1. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनाक 10 नोव्हेंबर 2020 रोजीचे शासन परिपत्रक क्र. सकीर्ण -2020 / प्र. क्र. 140
2. क्र. ईओजी/ 94 दि. 18.11.2020.
3. एमडीजी/ 8574 , दिनांक 20/11/2020.

**संदर्भ क्रमांक 2 नुसार दि. 23.11.2020 पासून इयता 9 वी ते इयता 12 वी चे वर्ग सुरु करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव नियंत्रणात असला तरीही अन्य देशामध्ये कोरोना विषाणूची आलेली दुसरी लाट व अन्य राज्यांतील कोरोनाची परिस्थिती पाहता सदर कोरोना विषाणूची दुसरी लाट आपल्या देशामध्ये व आपल्या राज्यामध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पुढील 4 ते 6 आठवडे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असल्याने इयता 9 वी ते इयता 12 वी च्या शाळा दि. 23 नोव्हेंबर 2020 पासून सुरु न करता खबरदारीचा उपाय म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या सर्व शाळा व सर्व विद्यालये विद्यार्थ्यांसाठी दि. 31 डिसेंबर 2020 पर्यंत बंद ठेवण्यास मान. मनपा आयुक्तांच्या संदर्भ क्र. 3 नुसारच्या मंजूरी अन्वये खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.**

1. **बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या सर्व शाळा व सर्व विद्यालये विद्यार्थ्यांसाठी दि. 31 डिसेंबर 2020 पर्यंत बंद ठेवण्यात येत आहेत.**
2. **महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाच्या पूर्व नियोजीत सुरु असणा-या इयता 10 वी व इयता 12 वीच्या पूरवणी परिक्षा पूर्व नियोजित वेळापत्रकाप्रमाणे सुरु ठेवण्यात येतील.**

**उपरोक्त 1 ते 2 येथील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी व त्याचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.**

MPalkar 20/11/2020

महेश पालकर
**(शिक्षणाधिकारी)**
शिक्षणाधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका

**प्रत माहिती व कार्यवाहीकरीता**

उपप्रमुख लेखापाल (शिक्षणनिधी)
शिक्षण निरीक्षक, (बृहन्मुंबई पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग)
उपशिक्षणाधिकारी (खाजगी / माध्यमिक / प्राथमिक / शहर / पूर्व व पश्चिम उपनगरे)
सर्व प्रशासकीय अधिकारी (शाळा) / अधीक्षक (शाळा) विभाग निरीक्षक (शाळा)
सर्व मुख्याध्यापक, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महापालिका प्राथमिक व माध्यमिक आणि सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा

**प्रत माहितीकरीता सविनय सादर-**

मान. महापालिका आयुक्त
मान. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मान. सह. आयुक्त (शिक्षण)
मान. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे.
मान. शिक्षण उपासंचालक, मुंबई विभाग.

MPalkar 20/11/2020

महेश पालकर
शिक्षणाधिकारी

Scanned with CamScanner